दिनांक 06/08/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 77

विषय – विटा नगरपरिषदेच्या मालकीच्या असलेल्या विविध प्रकारच्या वाहनांचा विमा उतरविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 05/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद अंतर्गत विविध कामकाजासाठी वापरण्यात येणा-या घंटागाडी, ट्रॅक्टर, अग्निशमन गाडी, मैला टँकर, पाणी टँकर,बोलेरा जीप, अग्निशमन बुलेट व इतर या वाहनांचा वापर दैनंदिन कामकाजात मोठया प्रमाणावर होतो. नगरपरिषदेच्या वापरात असणा-या ज्या वाहनांचा विमा संपला आहे. त्या वाहनांचा विमा काढणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषद मालकीच्या विविध प्रकारच्या वाहनांचा विमा उतरविणेस मंजूरी देत आहे. सदरचा खर्च नगरपरिषद फंडातून करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 06/08/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 78

विषय – विटा नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. 5 येथे बॅडमिंटन हॉलची दुरूस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 05/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. 5 येथे बॅडमिंटन हॉलचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदर हॉलच्या तुटलेल्या खिडक्या बदलणे, मॅट टाकणे व सदर ठिकाणी मुला-मुलींकरीता वेगवेगळे बॅडमिंटन कोर्ट तयार करणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. 5 येथे बॅडमिंटन हॉलची दुरूस्ती करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा